# ४. सामाजिक परिवर्तन

## Social Change

A] सामाजिक परिवर्तन : अर्थ आणि स्वरूप
Social Change : Meaning And Nature.

प्रस्तावना :-

परिवर्तन हा निसर्गाचा नियम आहे. निसर्गाच्या संदर्भात परिवर्तन हा शब्द नेहमी वापरला जातो. निसर्गाप्रमाणेच मानवी समाजातदेखील परिवर्तन किंवा बदल घडून येतो. मानवी समाज हा पूर्णपणे कधीही स्थिर असत नाही. बदलत्या परिस्थितीनुसार मानवी समाजात परिवर्तन घडून आलेले आहे. मानव हा जसा समाजशील प्राणी आहे. तसा तो परिवर्तनशील प्राणी देखील आहे. मानवी समाजाच्या परिवर्तनाची प्रक्रिया सतत सुरु असते. आचार, विचार, सामाजिक संस्था, संघटना जीवनपद्धती यामध्ये परिवर्तन घडून येते. या परिवर्तनाच्या प्रक्रियेमुळेच हा समाज प्राचीन काळातील रानटी अवस्थेपासून आजच्या प्रगत अवस्थेपर्यंत पोहोचला आहे.

सामाजिक परिवर्तनाबरोबरच स्थिरता हे देखील मानवी समाजाचे वैशिष्ट्य आहे. हेरी जॉन्सन यांच्या मते, समाजामध्ये नेहमी दोन प्रक्रिया सुरु असतात.

१) समाजव्यवस्थेत स्थिरता निर्माण करणारी प्रक्रिया.
२) समाजव्यवस्थेत परिवर्तन / बदल घडवून आणणारी प्रक्रिया.

समाजाचे अस्तित्व टिकवण्यासाठी बदलत्या परिस्थितीबरोबर समायोजन साधण्याचे काम सामाजिक परिवर्तन प्रक्रियेने केले जाते. समाजशास्त्रात ही प्रक्रिया एका निश्चित अर्थाने वापरली जाते. ती पुढीलप्रमाणे :-

व्याख्या :- Definition

1) हेरी जॉन्सन :-

" मूलभूत अर्थाने समाज संरचनेतील बदल म्हणजेच

Scanned with CamScanner

सामाजिक परिवर्तन होय.

2) हॉर्टन आणि हंट :-

"सामाजिक संरचनेतील आणि सामाजिक संबंधातील बदल म्हणजे सामाजिक परिवर्तन होय."

3) किंग्जले डेव्हिस :-

"केवळ समाजाच्या संघटनेत म्हणजेच समाज संरचनेत आणि कार्यात घडून येणाऱ्या बदलांना 'सामाजिक परिवर्तन' असे म्हटले जाते."

4) गिलीन आणि गिलीन :-

"समाजमान्य जीवनपध्दतीमध्ये झालेला बदल म्हणजे 'सामाजिक परिवर्तन' होय."

सामाजिक परिवर्तन म्हणजे समाज रचनेतील बदल संघटनेतील बदल दर्जा आणि भूमिका यामधील बदल जीवनपध्दतीमध्येहोणारे बदल असा याचा अर्थ होतो. या संकल्पनेचे स्वरुप व वैशिष्ट्ये पुढीलप्रमाणे:

1) समाजरचनेतील बदल म्हणजे सामाजिक परिवर्तन :-

प्रसिध्द विचारवंत हॅरी जॉन्सन यांच्या मते, समाजाच्या संरचनेमध्ये कोणत्याही कारणामुळे कोणताही बदल झाला तर अशा बदलांना सामाजिक परिवर्तन म्हणून ओळखले जाते. प्रत्येक मानवी समाजाला संरचना प्राप्त झालेली असते. परस्पर संबंधांमध्ये बदल झाल्याने त्याचा परिणाम संरचनेवर होऊन संरचनेमध्ये बदल होतो. त्यामुळे परिवर्तन घडून येते. उदा. भारतीय समाजातील शेतीप्रधान अर्थव्यवस्थेएवजी उद्योगप्रधान अर्थव्यवस्थेला महत्त्व आल्याने संयुक्त कुटुंबाचे विघटन होऊन विभक्त कुटुंबपध्दती निर्माण झाली.

प्रत्येक व्यक्तीला समाजात विशिष्ट असा दर्जा व दर्जानुसार भूमिका पार पाडावी लागते. कोणत्याही कारणाने संरचनेच्या विशिष्ट भागात बदल झाल्यास संरचनेत बदल होतो. संरचनेच्या कोणत्याही घटकात ( दर्जा, भूमिका, सामाजिक संस्था, सामाजिक नियमने, सामाजिक मूल्य इ.) होणाऱ्या परिवर्तनास सामाजिक परिवर्तन असे

म्हणतात.

२) **सामाजिक मूल्यातील परिवर्तन :-** सामाजिक मूल्यामध्ये झालेला बदल समाजाच्या संरचनेत बदल होण्यास कारणीभूत ठरतो. कारण सामाजिक मूल्य ही त्या समाजाच्या सदस्यांनी स्विकारलेली असतात. सामाजिक मूल्य म्हणजे योग्य- अयोग्य, चांगले - वाईट ठरवण्याचे सदस्यांनी स्विकारलेले सर्वसामान्य स्वरुपाचे आदर्श होय. सामाजिक मूल्याप्रमाणे व्यक्ती आपली भूमिका पार पाडते. जर सामाजिक मूल्यांमध्येच बदल झाला तर संपूर्ण समाजव्यवस्थेमध्ये परिवर्तन होते. उदा. लोकशाही, समता, सामाजिक न्याय इ. मूल्यांनी परंपरागत समाजात परिवर्तन घडूनवून आणले. यासाठी सामाजिक मूल्यांमध्ये होणारा बदल हे सामाजिक परिवर्तन ठरत असतो.

३) **सामाजिक संस्थांमधील परिवर्तन :-** सामाजिक संस्था या सामाजिक संरचनेचे शाश्वत स्वरुप आणि घटक आहेत. उदा. कुटुंब संस्था, धर्म संस्था, शिक्षणसंस्था इ. या संस्थांमध्येच बदल घडून येणे म्हणजे समग्र समाजामध्येच परिवर्तन घडून येणे होय. उदा. संयुक्त कुटुंबा ऐवजी विभक्त कुटुंब निर्माण होणे, हुकुमशाही शेवट जाऊन लोकशाही शासन अस्तित्वात येणे ही संस्थात्मक परिवर्तनाची उदाहरणे आहेत. सामाजिक संस्थांमध्ये दर्जा, भूमिका यांची एक रचना असते त्याला विशिष्ट नियम असतात. समाजातील सर्व संस्था परस्परसंबंधित आणि परस्परावलंबी असल्याने एका संस्थेमध्ये बदल झाल्यास समग्र समाजव्यवस्थेमध्येच बदल घडून येतो. त्यामुळेच संस्थात्मक बदलांना सामाजिक परिवर्तन असे म्हटले जाते.

४) **सामाजिक संबंधामधील बदल :-** मॅकायव्हर व पेज या समाजशास्त्रज्ञांनी सामाजिक संबंधांमधील बदल म्हणजे सामाजिक परिवर्तन असे म्हटले आहे. समाज म्हणजे परस्पर सामाजिक संबंधांचे जाळे असल्याने काही सामाजिक संबंधांमध्येच बदल झाला तर संपूर्ण समाजातच

परिवर्तन घडून येते. समाजातील हे संबंध व्यक्ती-व्यक्ती, व्यक्ती-समूह आणि समूह-समूह या प्रकारचे असतात. अशा विविध प्रकारच्या संबंधामध्ये सातत्याने परिवर्तन होत असते. हे बदल सामाजिक परिवर्तन म्हणून ओळखले जातात. उदा. पूर्वीच्या काळातील गुरु-शिष्य यांच्यातील संबंध आणि आजचे विद्यार्थी-शिक्षक यांच्यातील संबंध. जमीनदार-शेतमजूर, पती-पत्नी इ.

५) सार्वत्रिक घटना :-

सामाजिक परिवर्तन ही सार्वत्रिक स्वरूपात घडणारी घटना आहे. सर्वच मानवी समाजात परिवर्तन हे घडून येत असते. कोणताच समाज पूर्णपणे स्थितीशील असत नाही. फरक एवढाच की प्रत्येक समाजामध्ये परिवर्तनाच्या गतीमध्ये कमी-जास्तपणा दिसून येतो. सामाजिक परिवर्तन ही एक सार्वत्रिक घडणारी घटना आहे

६) निरंतर प्रक्रिया :-

सामाजिक परिवर्तनाची प्रक्रिया नेहमी सुरु असते. ही प्रक्रिया कोणत्याही समाजात कधीही पूर्णपणे स्थिर किंवा थांबलेली दिसून येत नाही. यातील काही बदल मूर्त असतात. तर काही बदल अमूर्त असतात. परिवर्तनाची ही प्रक्रिया प्राचीन काळापासून ते आजच्या आधुनिक काळापर्यंत निरंतरपणे सुरु असल्याचे दिसून येते.

७) सामाजिक परिवर्तनामध्ये पूर्वकथन किंवा भविष्यवाणी अशक्य असते :-

सामाजिक परिवर्तनाची प्रक्रिया यासंदर्भात अचूकपणे भविष्य कथन करणे अशक्य आहे. कारण परिवर्तन हे नियोजनपूर्वक तसेच पूर्वनियोजनाशिवाय देखील घडून येत असते. परिवर्तनाविषयी काही अंदाज बांधले जातात. किंवा बांधता येतील परंतु याच पद्धतीने परिवर्तन होईल हे खात्रीशीरपणे सांगता येत नाही. परिवर्तनामध्ये काय होईल याचा अंदाज पूर्वकथन करणे किंवा भविष्यवाणी करणे अशक्य असते.

८) तटस्थ संकल्पना :-

सामाजिक परिवर्तन ही एक उदासीन संकल्पना आहे. समाजामध्ये होणाऱ्या बदलांना उद्देशून ही संकल्पना वापरली जाते

Scanned with CamScanner

मात्र परिवर्तन हे चांगले की वाईट असेल, अल्पकाळासाठीकी दि
काळासाठी असेल ही चर्चा यामध्ये अभिप्रेत नाही. कारण या
संकल्पनेवर कोणतेही बंधन किंवा मर्यादा नाहीत.

## e) सामाजिक परिवर्तन आणि सांस्कृतिक परिवर्तन यामध्ये फरक आहे :-

सामाजिक परिवर्तन आणि सांस्कृतिक परिवर्तन यादोन्ही संकल्पना भिन्न स्वरुपाच्या आहेत कारण सांस्कृतिक परिवर्तन ही व्यापक संकल्पना आहे. तर सामाजिक परिवर्तन त्यातुलनेने मर्यादित असे आहे.

संस्कृतीच्या कोणत्याही घटकात बदल झाल्यास त्यास सांस्कृतिक परिवर्तन म्हणून ओळखले जाते. परंतु सर्वच सांस्कृतिक बदल हे सामाजिक बदल असतीलच असे नाही. उदा. मराठी नाटकांमध्ये विदूषक या पात्राचा पुन्हा वापर करणे हे सांस्कृतिक परिवर्तन आहे. मात्र ते सामाजिक परिवर्तन होणार नाही कारण कारण सामाजिक परिवर्तन हे केवळ समाजरचनेतील बदलापुरतेच मर्यादित असते.

मात्र सामाजिक परिवर्तन झाल्यास त्यास सांस्कृतिक परिवर्तन असे म्हटले जाते कारण सामाजिक परिवर्तन हा सामाजिक संरचनेचा म्हणजेच संस्कृतीचाच एक भाग आहे. त्यामुळे सामाजिक परिवर्तन हे सांस्कृतिक परिवर्तन होऊ शकते. परंतु सांस्कृतिक परिवर्तन सामाजिक परिवर्तन असेलच असे नाही.

## १०) सामाजिक परिवर्तन ही अपरिहार्य संकल्पना आहे.

## ११) सामाजिक परिवर्तन ही अमूर्त संकल्पना आहे.

## १२) सामाजिक परिवर्तनाशी संबंधित संकल्पना किंवा सामाजिक परिवर्तनाचे प्रकार पुढील प्रमाणे :- उत्क्रांती, क्रांती, प्रगती, विकास

वरीलप्रमाणे सामाजिक परिवर्तन या संकल्पनेचा अर्थ, स्वरूप आणि वैशिष्ट्ये स्पष्ट केली जातात.

Scanned with CamScanner

Page No.
Date: / /

B] सामाजिक परिवर्तनाचे घटक :-

Factors of Social Change

प्रस्तावना :-

सर्वच समाजामध्ये सातत्याने परिवर्तन घडून येत असते घडून येणारे सामाजिक परिवर्तन हे एकाच घटकामुळे किंवा कारणां मुळे घडत नाही. त्यासाठी अनेक कारणे जबाबदार असतात. मात्र काही विचारवंतांनी सामाजिक परिवर्तनास कोणतातरी एखादाच घटक जबाबदार असतो असे स्पष्ट केले आहे.

ऑगस्त कॉम्प्त यांच्या मते मानवी बुद्धिमत्तेचा झालेला विकास परिवर्तनास जबाबदार असतो.

स्पेन्सरच्या मते, जे सामर्थ्यशील आहेत तेच टिकतात. इतरांचा ऱ्हास होतो.

बकलच्या मते भौगोलिक परिस्थितीत बदल झाल्यास सामाजिक परिवर्तन होते.

कार्ल मार्क्सच्या मते उत्पादन पध्दतीत होणारा बदल-सामाजिक सामाजिक परिवर्तनास जबाबदार ठरतो.

विचारवंतांनी वरील मत स्पष्ट केले असले तरी प्रत्यक्षात मात्र कोणत्यातरी एकाच कारणानी परिवर्तन होत नाही. कारण हेच परिवर्तन होणे एक गुंतागुंतीची प्रक्रिया असल्याने सामाजिक परिवर्तनास अनेक घटक किंवा कारणे जबाबदार ठरतात ती पुढीलप्रमाणे :-

१) भौगोलिक घटक :-

भौगोलिक घटक किंवा भौतिक पर्यावरण सा. परिवर्तनाचा एक महत्वाचा घटक आहे. भौगोलिक वातावरणात जमीन, डोंगर, पाऊस, तापमान, नद्या, समुद्र, पाणी, भूकंप, उष्णता, खनिज संपत्ती यांसारख्या अनेक घटकांचा समावेश झालेला असतो. भौगोलिक वातावरणाचा मानवी जीवनावर प्रभाव पडलेला असतो. अशा भौगोलिक घटकांमध्ये बदल झाल्यास हे बदल समाजजीवन प्रभावित करतात. या पर्यावरणाशी समायोजन साधून सामाजिक जीवन व संस्कृती निर्माण झालेली असते.

उदा :- नदीकाठच्या प्रदेशातील लोक शेती करतात. समुद्रकिनाऱ्यावरील लोक मासेमारीचे तंत्र स्विकारतात. म्हणजेच भौगोलिक घटक किंवा भौति

Scanned with CamScanner

भौतिक - परिस्थिती मानवी सामाजिक जीवन प्रभावित करते ज्यावेळी भौतिक परिस्थिती अचानकपणे मोठे बदल घडून येतात, त्याचा परिणाम सामाजिक जीवनावर होतो. व समाजरचनेमध्येही बदल घडून येतो. उदा :- भूकंप, दुष्काळ, महापूर या नैसर्गिक घटकांमुळे लोकांना स्थलांतर करावे लागते. स्थलांतरामुळे त्यांच्या सामाजिक, सांस्कृतिक, आर्थिक जीवनात बदल घडून येतात.

भौगोलिक घटकांमध्ये जसे नैसर्गिक बदल होतात. तसे मानवाच्या असं कृतीमुळे देखील बदल होऊन परिवर्तनास चालना मिळते. मानवाच्या असंख्य गरजा भागवण्यासाठी नैसर्गिक साधन संपत्तीचा अमर्याद अमर्याद वापर केल्याने पर्यावरणाचा ऱ्हास होत चालला आहे. यामुळे जे पर्यावरणात बदल झालेले आहेत. त्याचा परिणामही सामाजिक जीवनावर होत आहे. म्हणजेच भौगोलिक घटक सामाजिक परिवर्तनाचा एक महत्वाचा घटक आहे.

2) लोकसंख्यात्मक घटक :-

समाजाच्या लोकसंख्येत होणारे व्यापक प्रमाणातील बदल सामाजिक परिवर्तनास जबाबदार ठरतात. लोकसंख्येच्या विविध घटकांमध्ये बदल झाल्यास त्यात घडून येणारे परिवर्तन पुढीलप्रमाणे :-

1) लोकसंख्येची वाढ :-

लोकसंख्येत वाढ झाल्यास लोकसंख्येचा प्रश्न निर्माण होऊन त्याचा प्रभाव समाजावर पडतो. आणि त्यामधूनच दारिद्र्य, बेकारी, प्रदुषण, गलिच्छ वस्ती अशा समस्या निर्माण होतात लोकांचे आरोग्य बिघडते. राहणीमानाचा दर्जा घसरतो. दुय्यम संबंध वाढत जातात. परिणामी कौटुंबिक व सामाजिक विघटन घडून येते. म्हणजेच लोकसंख्या वाढीमुळे सामाजिक संरचनेमध्ये बदल घडून येतो.

2) अनुवंशिकता व वंशसंकर :-

अनुवंशिकतेच्या तत्वानुसार नव्या पिढीला काहीतरी नवीन गुणवैशिष्ट्ये आत्मसात होत असतात. जुन्या पिढीपेक्षा नवीन पिढीमध्ये नवीन अनुभव आधुनिक शिक्षण लाभल्याने हा फरक जाणवतो. या फरकामुळे सामाजिक परिवर्तन घडून येते.

लोकसं

Scanned with CamScanner

लोकसंख्यात्मक घटकातील वंशसंकर हा एक महत्त्वाचा घटक मानला जातो. स्त्री- पुरुषांमध्ये- वंशसंकर घडून आल्याने भिन्नतेचे प्रमाण वाढत चालले आहे. या भिन्नतेमुळे सामाजिक संरचनेत देखील बदल होतो. अशा बदलामधूनच परिवर्तन घडून येते.

3) जन्मदर व मृत्यूदर :-

मानवी समाजातील जन्मदर व मृत्यूदर याचा देखील समाजावर परिणाम होतो. लोकसंख्या अधिक वाढणे किंवा कमी होणे. जन्मदर व मृत्यूदरामध्ये तफावत राहणे स्त्री- पुरुष प्रमाण कमी- जास्त होणे. लोकांचे आयुष्य वाढणे किंवा कमी यांसारखे बदल लोकसंख्येमध्ये नेहमी होत असतात. त्याचा प्रत्यक्ष, अप्रत्यक्षपणे समाजावरती प्रभाव पडत असतो यामधूनच सामाजिक परिवर्तन चालना मिळते.

४) स्थलांतर :-

एका भागातील लोकसंख्येचे दुसऱ्या भागात स्थलांतर स्थलांतर झाल्यास त्या लोकांच्या सामाजिक व सांस्कृतिक जीवनात बदल होतो. त्यांची सामाजिक आर्थिक सांस्कृतिक परिस्थिती बदलल्याने परिवर्तन घडून येते. उदा. नागरिकरणामुळे संयुक्त कुटुंबपद्धतीचे विघटन घडून आले.

लोकसंख्यात्मक घटकामध्ये वरील कोणताही बदल झाल्यास परिवर्तन घडून येते. नवनवीन समस्या उद्भवतात त्यावरती उपाय शोधण्यासाठी नवीन संशोधनास चालना मिळते. लोकसंख्येची वाढ स्थलांतर जन्मदर व मृत्यूदरामधील तफावत या लोकसंख्यात्मक घटकामुळे सामाजिक परिवर्तन घडून येते.

Scanned with CamScanner

3) आर्थिक घटक :-

आर्थिक घटक हे देखील सामाजिक परिवर्तनास जबाबदार ठरतात. आर्थिक सुधारणा आल्यामुळे त्या समाजाच्या सामाजि संस्था, परंपरा, रितीरिवाज यामध्ये बदल घडून येतो. भारतात औद्योगिक विकास झाल्यामुळे सामाजिक संरचनेत महत्वाचे परिवर्तन घडून आले. व्यक्तीच्या आर्थिक परिस्थितीमध्ये बदल झाल्यास त्यांच्या सा. संबंधामध्ये बदल घडून येतो.

कार्ल मार्क्स या विचारवंताने सामाजिक परिवर्तनात आर्थिक घटकांना महत्वाचे स्थान दिले. उत्पादन पध्दतीमध्ये बदल झाला तर सामाजिक संस्था, सामाजिक संबंध यामध्येही बदल घडून येतो. आर्थिक घटक हा देखील सामाजिक परिवर्तनाचा एक महत्त्वाचा घटक असल्याने आर्थिक घटकात कोणताही बदल झाल्यास त्याचा परिणाम सामाजिक जीवनावर पडून समाजामध्ये परिवर्तन घडून येते.

4] तांत्रिक घटक :-

आधुनिक काळात तांत्रिक घटक हा सामाजिक परिवर्तनाचा एक महत्वाचा घटक आहे. कारण तांत्रिक घटकांमुळेच औद्योगिक क्रांतीला चालना मिळते. उत्पादन, व्यापार, दळणवळण तसेच इतर क्षेत्रातही बदल घडून येतात. या औद्योगिकरणामुळे शहरीकरण घडून येते. मोठमोठ्या शहरांमध्ये लोकसंख्या अधिक असल्या दुय्यम आणि औपचारिक संबंधांना महत्त्व प्राप्त होते. तांत्रिक विकासामु संपत्ती आणि गुणकौशल्ये याला महत्त्व प्राप्त होते. मात्र त्याचबरोबर व्यक्तिवादास प्रोत्साहन मिळते. गुन्हेगारी, झोपडपट्टी या समस्याही निर्माण होतात.

सामाजिक आणि कौटुंबिक जीवनाप्रमाणेच धार्मिक आणि सांस्कृतिक जीवनावरही तांत्रिक घटकांचा प्रभाव पडतो. शास्त्रीय घटकां महत्त्वप्राप्त होते. परंपरागत धार्मिक वृत्ती नष्ट होते. रुढी, परंपरा कर्मकांड यामध्ये बदल होतो. एकूणच तांत्रिक घटकांच्या प्रभावाने सामाजि कौटुंबिक, धार्मिक व सांस्कृतिक क्षेत्रामध्ये बदल घडून आल्याने सामाजिक परिवर्तन घडून येते. उदा. औद्योगिकरणामुळे भारतात उदा शहरीकरण घडून आले. त्या शहरीकरणाच्या प्रभावाने संयुक्त कुटुंबाचे विघटन होऊन

Scanned with CamScanner

Page No.
Date: / /

⑤ सांस्कृतिक घटक →

प्रत्येक समाजाची एक विशिष्ट संस्कृती असते. त्या संस्कृतीमध्ये भौतिक, अभौतिक किंवा मूर्त - अमूर्त घटकांचा समावेश होतो. मात्र संस्कृतीमध्ये नेहमी अभौतिक किंवा अमूर्त घटकांना महत्त्व दिले जाते. उदा. ज्ञान, कला, श्रद्धा, नीती-तत्वे, सा. मूल्ये इ. संस्कृतीच्या या अभौतिक घटकांमध्ये बदल झाल्यास त्याचा परिणाम सामाजिक जीवनावर होऊन परिवर्तनास चालना मिळते.

तांत्रिक घटकांमध्ये बदल झाल्यास लोकांचे आचार-विचार सामाजिक मूल्ये, सामाजिक संस्था यादेखील प्रभावित होतात. तांत्रिक घटकांचा स्विकार करायचा की नाही तेह त्या समाजाच्या सांस्कृतिक घटकावर अवलंबून असते. त्यामुळेच तांत्रिक गोष्टींचा स्विकार सर्व समाजात सारख्या प्रमाणात झाल्याचे निदर्शनास येत नाही. त्यामुळे या घटकांचा सामाजिक जीवनावर एकसारखा परिणाम होत नाही. विशिष्ट सांस्कृतिक घटकांमुळेच विशिष्ट प्रकारच्या आर्थिक राजकीय व सामाजिक संस्था निर्माण होतात. मॅक्स वेबर ने उदा. भांडवलशाहीच्या विकासासाठी प्रोटेस्टंट विचारसरणी कशी महत्त्वाची ठरली याचे विश्लेषण केले आहे. इंग्लंड, अमेरिका या देशातच भांडवलशाहीचा विकास झाला. परंतु रटली, स्पेन या देशात त्यांच्या तुलनेत भांडवलशाहीचा विकास झाला नाही याचाच अर्थ एखादया समाजात परिवर्तन कसे होईल हे त्या समाजाच्या सांस्कृतिक घटकांवर अवलंबून असते कारण कोणतीही संस्कृती स्थिर असत नाही. नवनवीन शोध, संशोधन यामुळे सांस्कृतिक घटकांमध्ये बदल होत असतो. परंपरागत सामाजिक मूल्यांची जागा नवीन सामाजिक मूल्ये घेत असतात. त्यामुळेही सामाजिक परिवर्तन घडून येते.

**सारांश :-**

नैसर्गिक किंवा भौगोलिक घटक, आर्थिक, तांत्रिक व सांस्कृतिक घटक यामुळेच सामाजिक परिवर्तन होत असते. या घटकांबरोबरच व्यवसाय, शिक्षण, सामाजिक गतीशिलता, मानसिक प्रेरणा कारणांमुळे देखील परिवर्तन घडून येते. कोणत्यातरी एखादया घटकामुळे किंवा कारणामुळे सामाजिक परिवर्तन होत नाही त्यासाठी

असंख्य कारणे जबाबदार ठरत असतात.

C] सामाजिक परिवर्तनातील अडथळे :-

Obstacles in social change.

प्रस्तावना :-

मानवी समाजामध्ये घडून येणाऱ्या सामाजिक परिवर्तन या संकल्पनेचा अभ्यास करताना असे दिसून येते की सामाजिक प. गती दिशा सर्वत्र एकसारखी नसते. कारण त्या समाजातील सामाजिक परिस्थि परिवर्तनास अनुकूल असेलच असे नाही. अशा काही घटना, घटक, तत्वे असतात की ज्यामुळे परिवर्तनाला प्रोत्साहन मिळत नाही. ज्या ठिकाणी सामाजिक परिवर्तनास अनुकूल वातावरण असेल त्या ठिकाणी परिवर्तन घडून येण्यास मदत होते. याचाच अर्थ परिवर्तनाच्या प्रक्रियेत अडथळा किंवा बाधा निर्माण करणारे काही घटक असतात. त्यापैकी काही महत्त्वाचे घटक किंवा अडथळे पुढीलप्रमाणे :-

१) परंपरा :-

मनुष्यप्राणी हा परंपराप्रिय प्राणी आहे. परंपरांचा मानवी जीवनावर विशेष प्रभाव पडल्याचे दिसून येते. अशा परंपरांचा स्विकार लोकांनी अंध प्रवृत्तीने केलेला असतो. परंपरांच्या विरोधात वर्तन करण्यासाठी कोणतीही व्यक्ती सहज तयार होत नाही. काही परंपरा कालबाह्य झालेल्या असतात. तरीदेखील समाज त्या परंपरा सोडण्यास तयार नसतो. अशा परंपरा सामाजिक, धार्मिक, सांस्कृतिक अशा सर्व क्षेत्रामध्ये दिसून येतात. या परंपरांच्या प्रभावामुळे होणाऱ्या सा. परिवर्तनाला विरोध केला जातो. किंवा त्याचा स्विकार न केला जात नाही (अंधश्रध्दा आणि आधुनिक विचारसरणी)

२) अज्ञान :-

अज्ञानामुळे लोक सामाजिक परिवर्तनास विरोध करतात अज्ञानातूनच अनेक चुकीच्या समजुती, अंधश्रद्धा निर्माण होतात. त्यामुळेच मानव वस्तुनिष्ठ विचार करु शकत नाही. नवीन गोष्टींना विरोध केला जातो. नवीन ज्ञान मिळवण्याचा प्रयत्न केला जात नाही. अशा अज्ञानामुळे समाज स्थितीशील बनतो. उदा. भारतात शिक्षणाचा

शिक्षणाचा अभाव असल्याने अज्ञानी, निरक्षर लोकांचे प्रमाण जास्त होते. आपली परंपरागत जीवनपद्धती हीच चांगली आहे. असा त्या लोकांचा विश्वास असतो. त्यामुळे समाज परिवर्तन करण्यास अनुकूल होत नाही.

3) नवीन शोधांना विरोध :-

ज्या समाजात नवनवीन शोधांना विरोध केला जातो अशा समाजात परिवर्तन घडून येत नाही. परंपराप्रिय आणि जुन्या गोष्टींचा अधिक वापर करणाऱ्या व्यक्ती नवीन शोधांना विरोध करतात. त्यामुळे नवीन शोध लावण्यास प्रेरणा मिळत नाही. नवीन शोध हे धर्मविरुद्ध मानले जातात. ज्या शोधांमुळे परिवर्तनास चालना मिळणार असते. अशा शोधांनाच विरोध केल्यामुळे सामाजिक परिवर्तनामध्ये अडथळा निर्माण होतो. नवीन शोधांना विरोध करण्याची पद्धत असलेल्या समाजात परिवर्तनास योग्य त्या प्रमाणात गती मिळत नाही.

४) नवीन शोधांचा अभाव :-

विज्ञान, तंत्रज्ञान याबरोबरच सामाजिक जीवनातील नवनवीन शोध यामुळे परिवर्तनाला चालना मिळत असते. मात्र समाजामध्येच संशोधन करून नवीन शोध लावण्याची इच्छाशक्ती असणाऱ्यांची संख्याच कमी असेल तर नवीन शोध लागले जात नाहीत. याबरोबरच इतर देशामध्ये, समाजामध्ये लागलेले शोध दुसऱ्या समाजापर्यंत पोहोचवण्यासाठी भौतिक संपर्काची गरज असते. उदा. भारतातील आदिवासी समाज भौतिक संपर्कापासून दूर असल्याने त्या समाजात नवीन शोधांचा अभाव दिसून येतो. ज्या ठिकाणी नवीन शोधांचा अभाव असतो. तेथील परिवर्तनाची गती देखील मंद स्वरूपाची असते.

५) नवीन गोष्टींचे भय किंवा भिती :-

समाजामध्ये नव्याने प्रस्थापित होणाऱ्या गोष्टींविषयी लोकांच्या मनात शंका, भितीचे वातावरण असते. नवीन गोष्टींचे परिणाम चांगले की वाईट त्याचा समाजासाठी फायदा होईल का, त्याचे परिणाम होणार नाहीत ना अशा अनेक प्रकारचे प्रश्न भिती लोकांच्या मनामध्ये असते. हे प्रश्न संशयाची वृत्ती नवीन

काही गोष्टी स्विकारण्यास विरोध करते. परिणामी ही संशयाची भावना व नवीन गोष्टींविषयीची भिती परिवर्तनाच्या प्रक्रियेमध्ये अडथळा ठरते.

६) व्यक्तीगत स्वार्थ :-

सामाजिक परिवर्तन घडून आल्यास त्यासमाजातील काही लोकांचे हितसंबंध धोक्यात येण्याची शक्यता असते. अशावेळी आपल्या हितसंबंधाचे रक्षण करण्यासाठी समाजामध्ये घडून येणाऱ्या परिवर्तनालाच विरोध केला जातो. आपलेच बरोबर असा प्रचार करत असलेला दिसतो. म्हणजेच व्यक्तिगत स्वार्थ जोपासण्यासाठी सामाजिक परिवर्तनाला विरोध केला जातो. उदा. परंपरागत धार्मिक जीवनात बदल झाल्यास आपल्या दर्जास धोका निर्माण होऊ शकतो. यासाठी पुरोहित वर्गाकडून केला जाणारा विरोध.

७) आर्थिक विषमता :-

ज्या समाजात गरीब आणि श्रीमंत अशी विषमता निर्माण झालेली आहे. त्या समाजामध्ये परिवर्तन होणे अत्यंत अवघड असते. जीवन जगण्याचा प्रश्न भेडसावत असताना नवीन तंत्रज्ञानाचा वापर करण्यासाठी सामर्थ्य त्यांच्याजवळ नसते. याचाच अर्थ आर्थिक विषमता, गरिबी, दारिद्र्य हे घटकदेखील परिवर्तनात अडथळा ठरतात.

८) शासनातील दोष / उणीवा :-

शासनाला विशिष्ट कायदे, योजना निर्माण कराव्या लागतात. मानवी समाजाचे कल्याण करण्यासाठी त्या शासनाचा दृष्टिकोन पुरोगामी असला तरच होणारे परिवर्तन फायदेशीर ठरु शकते. शासन, प्रशासकीय यंत्रणा, अकार्यक्षम, असंवेदनशील भ्रष्टाचारी असतील तर होणारे परिवर्तन देखील मंद गतीचे असते. म्हणजेच शासनातील काही दोष. काही उणीवा परिवर्तनाच्या प्रक्रियेमध्ये अडथळा ठरु शकतात.

९) परंपरावादी विचारसरणी.

१०) सनातनवादी दृष्टिकोन.

Scanned with CamScanner

वरील घटक परिवर्तनाच्या प्रक्रियेमध्ये अडथळा ठरत आहेत. मात्र परिवर्तनाच्या प्रक्रियेत कितीही आणि कोणतेही अडथळे असतेतरी ही प्रक्रिया कधी थांबत नाही. ती निरंतर सुरु असते. मात्र सामाजिक परिवर्तनाच्या गतीवर त्याचा परिणाम होत असतो. या गतीवरतीच - सामाजिक बदल, सामाजिक परिवर्तन, विकास अवलंबून असतो.

## * दिर्घोत्तरी प्रश्न :- Broad Questions.

१) सामाजिक परिवर्तन ही संकल्पना स्पष्ट करा. ०४.
सामाजिक परिवर्तन या संकल्पनेचा अर्थ स्वरुप स्पष्ट करा.

२) सा. परिवर्तनाचे घटक किंवा जबाबदार कारणे विशद करा.
किंवा
सा. परिवर्तनाच्या प्रक्रियेमधील अडथळे स्पष्ट करा.

## * टिपा लिहा. Short Notes.

१) सामाजिक परिवर्तन अर्थ किंवा वैशिष्ट्ये.
२) सामाजिक परिवर्तनास जबाबदार ठरणारे घटक किंवा कारणे.
३) सामाजिक परिवर्तनातील अडथळे.

Scanned with CamScanner